**<u>इ.फौ.कि.अर्ज क्र.०६/२०२५ मधील निशाणी ०९ वरील आदेश</u>**

**(साक्षी तांडेल वगैरे वि.शांताराम तांडेल वगैरे)**

**<u>सीएनआरनं.एमएचएसआय–०५–०००२७१–२०२५</u>**

०१. सामनेवाला क्र.१ यांच्यातर्फे वकिलांनी प्रस्तुत अर्ज साक्षीदारास साक्षीसमन्स काढण्याकरीता दाखल केला आहे.

०२. सामनेवाला क्र. १ यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार हिचे वागणे विक्षीप्त व मानसिकदृष्ट्या असमतोल व योग्य नसल्याने सामनेवाला क्र. १ व त्यांच्या कुटुंबियांनी अर्जदार हिच्या माहेरच्या मंडळींना विश्वासात घेवून अर्जदार हिला साईरुप हॉस्पीटल, कुडाळ येथील डॉ.रुपेश धुरी यांच्याकडे दि. १६/०४/२०२४ रोजी उपचारासाठी नेले. त्यानंतर दि.०६/०५/२०२४ ही पुढील तपासणीची तारीख दिलेली होती. त्यावेळी सामनेवाला क्र.१ हा डॉक्टरांकडे हजर राहिला. परंतु अर्जदार हिस तिची माहेरची मंडळी यांनी जाणीवपुर्वक व हेतूत: दवाखान्यात आणले नसल्याने सामनेवाला क्र. १ याने डॉ.रुपेश धुरी यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता डॉ.रुपेश धुरी यांनी अर्जदार हिचे उपचार अर्धवट सोडू नयेत असे सांगितले. तसेच सौ.रेश्मा भाईप, मानसशास्त्रज्ञ, जिल्हा रुग्णालय, ओरोस सिंधुदुर्ग यांचेशी अर्जदार हिची एकदा भेट करुन देण्याबाबत देखील डॉ. धुरी यांनी सामनेवाला क्र. १ यास सांगितले. त्यामुळे मूळ तक्रारीच्या परिच्छेद क्र. १० नुसार सामनेवाला याच्यावर करण्यात आलेल्या आरोपासंदर्भात वस्तुस्थिती अर्जाचे कामकाज चालण्यापूर्वी न्यायालयासमोर येणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. अर्जदार हिच्या मानसिक आजारपणासंदर्भातील सर्व कागदपत्रे हजर करण्याविषयी तसेच आवश्यक भासल्यास शपथेवर जाबजबाब देणेकामी साईरुप हॉस्पीटल, रजिस्टर्ड नं.०८२/२००५, ९/४ एम्.आय.डी.सी.कुडाळ, ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग येथील रुपेश धुरी यांना जरुर ते साक्षीसमन्स काढण्यात अशी विनंती प्रस्तुत अर्जान्वये सामनेवाला क्र.१ यांनी केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर अर्जदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतकामी अद्यापही अर्जदार यांचा पुरावा सुरु झालेला नाही. प्रस्तुतचे प्रकरण हे प्रारंभिक स्थितीमध्ये आहे. सामनेवाला क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रस्तुतकामी डॉ. रुपेश धुरी यांना साक्षीसमन्स काढणेकरीता

प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. सामनेवाला यांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार यांची मानसिक स्थिती योग्य नसून त्या अनुषंगाने वस्तुस्थिती अभिलेखावर येणे आवश्यक आहे. परंतु अर्जदार यांचा पुरावा आल्यानंतर सामनेवाला यांना अर्जदार यांचा उलटतपास घेण्याची पुर्ण संधी आहे. तसेच अर्जदार हे त्यांचे पुराव्याचे दरम्यान त्यांच्या इच्छीत साक्षीदारास समन्स काढून त्या अनुषंगाने अभिलेखावर पुरावा सादर करु शकतात. तसेच सामनेवाला हे अर्जदार हिच्या वैद्यकीय उपचाराबाबतची कागदपत्रे अभिलेखावर स्वत:हून देखील हजर करु शकतात. त्यामुळे प्रकरणाच्या प्राथमिक स्थितीवर केवळ सामनेवाला यांचे अर्जातील नमूद कथनांवर आधारीत राहून अर्जदार यांचा पुरावा सुरु होणेपुर्वी प्रथम सामनेवाला यांचे म्हणण्याप्रमाणे साक्षीसमन्स काढणे न्यायोचित होणार नाही. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) प्रस्तुत अर्ज सद्यस्थितीत नामंजूर करण्यात येतो.

२) पुराव्यावेळी संबंधीत साक्षीदारास समन्स काढण्यास अर्ज देण्याची सामनेवाला यांना मुभा राहील.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.03.02 16:21:04 +0530

दिनांक–२८/०२/२०२६ (एस.जे.चिवटे)

ठिकाण –वेंगुर्ला. न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.